

# नागांनाही मोहवी असा सोनचाफा

चाफ्याची फुले न आवडणारा निराळाच ! आपल्याकडे चाफा म्हणून जी फुले संबोधतो त्यात सोनाचाफ्याबरोबर हिरवा चाफा, देवचाफा, भुईचाफा, कवठी चाफा, नाग चाफा ही वनस्पती शास्त्रीय दृष्ट्या वेगवेगळी असली तरी एकत्रितपणे विचारात घेतली जातात. त्यातील सोनाचाफ्याचा साजंच अलग. हे चाफ्याचे सर्व प्रकार कवि माधवांनी सुरेख शब्दात एकत्र गुंफले आहेत.

*हंसे उपवनी अर्धोन्मिलीत सुवर्ण चंपक कळी*
*पाहुनी तुळशीवरी चिमुकली हालत निज साऊली*
*विविध सुवासी हिरवा चाफा चकित करी मानस*
*मंद सुगंध पसरितो भूईचाफा राजस*
*गडागडावर निवास जेथे मायभवानी करी*
*राही उधळीत फुले तेथे भुईचाफा राजस*
*घालीत रुंजी भ्रमती भृंगत्या नागचंपकावरी*

कमळ, पळस, पारिजात याबरोबच चाफ्यांच्या फुलांनी सर्व कवि मंडळींना वेड लावले आहे; प्राचीन साहित्यात मात्र कोठे चाफ्याचे उल्लेख आढळत नाहीत. जाई–जुई–सायली स्त्रीलिंगी तर तेरडा–धोतरा–चाफा–गुलाब ही पुल्लिंगी फुले. मोगरा हे नाव पुल्लिंगी वाटले तरी ज्ञानेश्वर माऊली मात्र मोगरी या नावाने संबोधतात.

लौकिकार्थाने कोणतेही पान–फूल अजरामर होऊ शकत नाही, पण कवी मंडळींनी मात्र आपल्या लेखणीद्वारे ही किमया साध्य करून दाखविली. चाफ्याची फुले साहित्यातील तीन व्यक्तीमुळे मुख्यत्वे मनात रुजली– कविराज भूषण, कवि बी व कवियत्री पद्मा गोळे!

कविराज भूषण हे कनोजी ब्राम्हण, शिवरायांचे भाट. त्यांनी शिवस्तुतीपर शिवबावनी व शिवराज भूषण हे शिवमहिमा सांगणारे ग्रंथ लिहिले. शिवरायांना तो ''शेर सिवा'' या नावाने संबोधत असे, पण शिवरायांना मात्र हे

स्तुतीकाव्य ऐकण्यास सवड मिळत नसे.

कविराजांना एकदा साक्षात शहेनशहांनी बोलावून स्वत:वर स्तुतिकाव्य करण्यास फर्मावले. तोंड देणारे साक्षात कविराज होते म्हणून ठीक, नाहीतर हा मोठा बाका प्रसंग होता.

औरंगजेबाला त्यांनी भ्रमराची उपमा दिली, तर मंडलिक राजांना फुलांची. काश्मीरचा राजा गुलाब, माळव्याचा जास्वंद, तर बंगालचा कमळ. सहाजिकच प्रश्न आला– सिवा कौन?

थोडाही विलंब न करता कविराज उत्तरले, सोनचाफा!.. समझने वाले समझ गये ! सोनचाफ्याच्या उग्र वासाने त्याला कधीही भुंगा लागत नाही. यावर बाळ कोल्हटकरांचे काव्य–

*औरंग हा भृंग सर्वत्र बैसे, बसेना जिजापुत्र चाफ्यावरी*

रविंद्रनाथांच्या ओळी तर प्रसिद्ध आहेत.....

***Where the golden glowing champak buds are flowering, there are fire flies flying, scattering the clouds of dreams.***

*गर्दसभोती रानसाजणी मी तर चाफेकळी,*
*काय हरवले सांग शोधशी या यमुनेच्या जळी!*

हे तर कवी बींचे काव्य प्रसिद्धच आहे.

*चाफा बोलेना, चाफा चालेना,*
*चाफा खंत करी काही केल्या फुलेना*

–प्रेयसी प्रियकराला चाफ्याच्या रुपात पाहते आणि त्याला खुलवायचे किती प्रयत्न करते हे या सुंदर काव्यात मांडले आहे. एक विचारधारा हे अध्यात्मिक काव्य मानते.

*चाफा उत्तररात्री फुलतो,*
*जसा जसा फुलतो तसा तसा*
*आसमंत सुगंधाने भरून जातो,*
*आसमंतही मावेनासा होतो*

– बाकी बा. भ. बोरकरांच्या शब्दात बोलताना

*लाटेपरी नको मोतियाने फुटू*
*नको चाफ्याच्या श्वासांनी संगे चालत लागटु–*

तर कुसुमाग्रज लिहितात–

*तू दिलेल्या चाफ्याच्या फुलातच तुला पाहतो आहे,*
*अनुभवतो आहे आणि माझ्याच अस्तित्वाला शोधत आहे*
*–उषेच्या सत्वात आकरालेले हे गंधमार्दव*

ज्ञानेश्वर माऊलींच्या सारखेही व्यक्तिमत्व चाफ्याचा मोह टाळू शकले नाही, वदतात हा सुवर्ण चंपकाचा कळा की कनकाचा पुतळा !

उपमान्य म्हणूनही चाफ्याचा उपयोग केला आहे – नाकाला चाफेकळी ची उपमा दिलेली आपण सर्वांना माहीत आहेच, पण एका अनामिका चे काव्य

*नयन मनोहर पाहुनी नीट फुलली कमळे निळी*
*तिक्ष्ण नासिका जणू शोभेग सुवर्ण चंपक कळी*

तर वसंत बापटांचे शब्द –

*रंगाने तू गव्हाळ त्यातुनी अंगावरती सोनसळा*
*टवटवीत घवघवीत मुखडा अंगावरती सोनकळा*

दुसऱ्या एका कवितेत म्हणतात–

*तसे पहाया तुला मला ग अजूनी दंव बिंदू थरथरतो*
*अर्ध्यामुर्ध्या कानगुजस्तव अजूनी ताठर चंपक फुलतो*

इंदिरा संत तर वेगळ्याच भावविश्वात घेऊन जातात –

*दोन चाफ्याच्या पाकळ्या किती लोभस चालल्या*
*हिऱ्या मोत्याच्या दंवाने किती लोभस साजल्या*
*सासरी तर चाफा बहरलेला, पण माहेरचा चाफा कसा*

*विसरता व येईल*

फुलांमध्ये फूल चाफ्याचं लाडीक सुगंधाच्या झुळकेवर नेत माहेरी आणिक वारा–कान्त वेगळ्याच आठवणी जागवतात.

*राती चाफा फुळी आला तशी जेव्हा हसलीस,*
*क्षण गळे तो फुलांचा नसे चाहूल फांदीला,*

सोनचाफ्याची सांगता कवयित्री पद्मा गोळ्यांचे शब्द वापरून,

*चाफ्याच्या झाडा, चाफ्याच्या झाडा*
*नको नारे डोळ्यात पाणी आणूस,*
*ओळखीच्या सुरात, ओळखीच्या तालात*
*हृदयाची गाणी नको ना म्हणू –*

कवठी चाफा – दोन प्रकार पांढरा संध्याकाळी फुलणारा तर पिवळा सूर्योदयाबरोबर – अतिसुगंधी – मात्र अल्पकाळ टिकणारा सुगंध

नागचाफा – त्याचे पराग म्हणजे नागकेशर, मसाल्यातील एक घटक अनेक औषधी उपयोग, गंधविरहीत मोठा वृक्ष असतो, फुलाला एग फ्लॉवर असेही म्हणतात. उकडलेले अंडे आडवे कापल्यावर दिसते तसे फुल दिसते. मध्ये पिवळे गर्द गोलाकारात पराग तर भोवताली पांढऱ्याशुभ्र पाकळ्यांचे मंडळ.

भुईचाफा ही कंदवर्गिय वनस्पती. ग्रीष्म ऋतूच्या शेवटच्या पर्वात जमिनीमधून एक दांडी वर येते, पूर्ण ३–४ दिवसात एक फूल उमलते. गुलाबी छटा अति सुगंधी. फूल सुकल्यावर पाने येतात. पुढील वर्षासाठी कंदात अन्नसंचय करून लुप्त होतात.

सुगंधाने सोनचाफ्याशी जवळीक म्हणून हिरवा चाफा या कुटुंबात सामील केला गेला. हे वनस्पती शास्त्रीय दृष्ट्या रामफळ, सीताफळ या कुळातले. फूल सहज नजरेस पडत नाही देखणे पण नाही पण सुगंधामुळे कविमंडळींना प्रिय–

*लपवलास तू हिरवा चाफा,*
*सुगंध त्याचा लपेल का प्रित लपवुनी लपेल का–*

हे सूत्रबद्ध गीत डॉ. शरदिनी डहाणूकरांनी किती यथायोग्य वर्णन केले आहे पहा. फूल झाडावर असताना पानाचा घुंगट सुद्धावर करणार नाहीत पण गंध मात्र या शालीनतेच्या बुरख्याआड दडवलेली मादकता दाखवून जातो.

उखाण्यात सुद्धा हिरवा चाफा आहे. कल्पना कविवर्य महानोर.

*हिरव्या आंब्या चाफ्याच चाफ्याच नाव घेते हो नाव*
*घेते चांद मोत्याचा भांग मोत्याचा भाळी चांदवा*
*मादा रायाचा*

उरला तो आता देव चाफा – विदेशी वृक्ष अनेकरंगी फुले, मंद सुवास. खूर चाफा, – मढी चाफा, क्षीरचंपक या नावाने पण ओळखला जातो. यावरची लोककथा–

सुमती व दुर्मती या राण्या असलेला एक राजा, निपुत्रिक असतो. पुत्रप्राप्तीसाठी अनेक व्रत उपाय चालू असतात. परमेश्वर कृपेने सुमतीला दिवस जाऊन पुढे पुत्रप्राप्ती होते. दुर्मतीचा मत्सर जागृत होतो, ते मूल ती जंगलात पुरते व त्याच्या जागी दगड ठेवते. असे सात वेळा घडते. साहजिक राजाला चीड येते, तो राणीची रवानगी जंगलात करतो. जिथे ही बालके पुरली असतात. तेथेच सुमती झोपडी बांधून राहू लागते. जेथे बाळे पुरली असतात, त्यातून सोन चाफ्याची झाडे उगवतात. राणी रोज सकाळी देव पूजेसाठी फुले गोळा करण्यास जात असे. तेव्हा ही वृक्षरुपी बाळे आपल्या फांद्या वाकवुन मातेच्या परडीत पुष्पभार उतरवत असत.

राजाला ही बातमी समजते– चौकशीअंती सर्व प्रकार त्याच्या लक्षात– सुमतीला तो सन्मानाने परत आणतो– मोठ्यामनाने ती दुर्मतीला क्षमा करतो.

कवी मंडळींना हे फुल प्रिय, काही बारमाही फुले आहेत तर काहींना वसंतऋतुत बहर येतो, पाणे झडुन झाड फुलायला लागते. शिरिष पैं वर्णन करतात–

*थंडी वाळता थोडी थोडी कमी झाली*
*शुभ्र चापयाच्या झाडाला कळी एक एक आली*
*एका फांदीच्या टोकाला गुच्छ आला बहरून*
*कधी कळी झाले फुल नाही आलेच कळून*

खरचं या ऋतुत कितीतरी कळ्यांची फुले होतात! किती साम्य आणि किती सार्थ शब्दात घातलेली सांगड !

चाकीबाबांचा चाफा –

*माझ्या गोव्याच्या भूमीत वाफा पानांन विणा फुले*
*भोळा भाबडा शाळीन भाव शब्दाविणा कले*

वा. रा. कान्तांच विश्लेषण–

*पांढरा संन्यस्थ वाफा गाळीत पाने उभा*
*जीवणी निष्पर्ण त्याच्या फुलपण आंदोळते.*

सांगता रविंद्रनाथांच्या शब्दांचा आधारे शिर्शका साठी वसंत बापटांच्या ओळींपैकी भूकच्या आळी नागांना ही मोहवी असा सोनचाफा,

आलेल्या पृथ्वीच्या नव्हाळीच्या वाफा

*आता निरोपाचा सुर धर कण्हेरी चंपका*
*अखेरच्या बहराने दुगुण्या भरा....*

वसंत बापटांची वेगळीच तऱ्हा–

*म्हातार्या पडल्या सटल्या सेनापती परी*
*गतस्मृतीचे बिल्ले लावुन दीमाख दाखवी*
*पांढरा चाफा*

◆

**डॉ. प्रकाश जोगळेकर**
**मो. : ९४२२३३९१०६**

